# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२२

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**शुक्रवार, दिनांक २५ मार्च, २०२२ / चैत्र ४, १९४४ ( शके )**

(१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री
(२) अन्न व औषध प्रशासन मंत्री
(३) अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री
(४) शालेय शिक्षण मंत्री
(५) उच्च व तंत्रशिक्षण मंत्री
(६) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री
(७) परिवहन, संसदीय कार्ये मंत्री
(८) पर्यटन, पर्यावरण व वातावरणीय बदल, राजशिष्टाचार मंत्री

} यांचे प्रभारी विभाग

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४१**

---

### वणी (जि.यवतमाळ) पंचायतसमिती अंतर्गत शिक्षकांचे नियमबाहय समायोजन केल्याबाबत

**(१) * ४३८६९ श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी (जि.यवतमाळ) येथील पंचायतसमिती अंतर्गत काही केंद्रात अतिरिक्त शिक्षक असून केंद्रातील अनेक शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त असतांना गटशिक्षणाधिकारी यांनी शासनाचे नियम डावलून शिक्षकांचे नियमबाहय समायोजन करण्यात आले असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमबाहय समायोजन करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आष्टी (जि.बीड) येथील नवीन बस स्थानकाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२) * ४३८४८ श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आष्टी (जि.बीड) येथील नवीन बस स्थानकाचे काम गत दोन वर्षापासून बंद असल्याने प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जुन्या बस स्थानकातील स्वच्छतागृह जमीनदोस्त केल्यामुळे महिलांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नवीन बस स्थानकाचे बांधकाम बंद असण्याची कारणे काय आहेत तसेच सदर काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही/उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. अनिल परब :** (१), (२), (३), व (४) सदर बस स्थानकाचे बांधकाम डिसेंबर, २०१९ ला सुरु करण्यात आले. मात्र कोवीडमुळे बांधकाम बंद होते. सध्यस्थितीत जोत्याचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. सदर बांधकाम हे सदयाच्या बस स्थानकाच्या पाठीमागील बाजूस सुरु असून बसस्थानकाची विदयमान इमारत पाडण्यात आलेली नसुन सदर बसस्थानकामधुन वाहतुक सुरु आहे.

कोरोना काळात बस स्थानकावरील फिरते स्वच्छतागृह नगर पालिकेने काढुन घेतले असल्याने सदर रेडीमेड स्वच्छतागृह पुन्हा बस स्थानकावर ठेवण्यासाठी कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील शिधापत्रिका धारकांच्या शिधापत्रिकांवर बारा अंकी बारकोड नसल्यामुळे धान्याचा लाभ मिळत नसल्याबाबत

**(३) * ४२५८१ श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील सुमारे तीन हजार शिधापत्रिका धारकांच्या शिधापत्रिकांवर बारा अंकी बारकोड क्रमांक नसल्यामुळे धान्याचा लाभ मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राधान्य कुटुंब गट व अंत्योदय योजनेत समाविष्ट असलेल्या जळगाव शहरातील शिधा पत्रिका धारकांना त्यांच्या शिधापत्रिकेवर बारा अंकी बारकोडचा शिक्का तहसील कार्यालयातून देण्यात येतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवीन शिधापत्रिका काढणे व त्यावर बारा अंकी बारकोड क्रमांक टाकून देण्यासाठी दलालांकडून ग्राहकांची आर्थिक फसवणूक होत असल्याच्या तक्रारी तसेच दुकानदार बारकोड असलेल्या शिधा पत्रिका धारकांनाही धान्याचा लाभ नाकारत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही.

(२) तहसिल स्तरावर शिधापत्रिकेची डाटा एंट्री शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणाली (RCMS) मध्ये करुन ती संगणकीकृत झाल्यावर शिधापत्रिकेस संगणक प्रणालीद्वारे बारा अंकी विशिष्ट क्रमांक दिला जातो.

(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा परिषद शाळा, आश्रम शाळा, वसतिगृह व खाजगी शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत

**(४) * ४२८०८ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांमध्ये विद्यार्थिनींवर लैगिंक अत्याचाराच्या घटना होत असताना यास आळा घालता यावा या उद्देशाने शासनाच्या शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेतला होता परंतु शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले नसल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील जिल्हा परिषद शाळा, आश्रम शाळा, वसतिगृह व खाजगी शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे प्राधान्याने बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) व (२) मा. उच्च न्यायालयाच्या निदेशांनुसार खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये आवश्यकतेनुसार सीसीटीव्ही बसविण्याच्या सूचना या विभागाच्या दिनांक ०७ एप्रिल, २०१६ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. तसेच याकरीता शासनाकडून अनुदान देण्यात येणार नाही, ही बाब स्पष्ट करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक परिक्षेत्रात वाहतूक पोलिसांकडून हेल्मेट सक्तीच्या नावाखाली दंड आकारणी होत असल्याबाबत

**(५) * ४३१३० श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक परिक्षेत्रात पोलिस आयुक्त यांनी वाहतूक शाखेला वसुली करिता उद्दिष्ट दिले असल्याने येथील वाहतूक पोलिसांकडून हेल्मेट सक्तीच्या नावाखाली दंड वसुली करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रश्न भाग १ च्या अनुषंगाने स्थानिक प्रवासी घटना नाशिकहून मुंबईकडे प्रवास करणारे प्रवासी यांनी वेळोवेळी केलेल्या तक्रारींनुसार तसेच "व्दारका चौक" येथील अवैध प्रवासी वाहतुकीला आळा घालण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून कोणती कार्यवाही/उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) व्दारका चौकात अवैध प्रवासी वाहतूकीला आळा घालण्यासाठी मोटार वाहन कायदा १९८८ कलम ६६(१)/१९२ अन्वये जानेवारी, २०२१ ते डिसेंबर, २०२१ या कालावधीमध्ये अवैध प्रवासी वाहतूक करणारे ३५ वाहनांवर मा.मोटार वाहन न्यायालयात खटला पाठविण्यात आलेला असून मा.न्यायालयाने कसुरदार वाहनधारकांना रु.६३,४००/- दंड केलेला आहे.

तसेच क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांवर एकूण १५८ केसेस मध्ये रु.३३,८००/- दंडात्मक कारवाई केली असून वाहतूक विभागाचे अधिकारी/ कर्मचारी यांना अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांवर मोटार वाहन कायदा १९८८ अन्वये कारवाई करण्याबाबत पोलीस आयुक्त, नाशिक यांचेकडून आदेश देण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे मांडवे खुर्द (ता.जामनेर, जि.जळगांव) येथे सार्वजनिक पाणी पुरवठा अंतर्गत उद्भव विहिर व पाईप लाईनच्या कामाबाबत

**(६) * ४१६६९ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मांडवे खुर्द (ता.जामनेर, जि.जळगांव) येथे ग्रामपंचायतीच्या मालकीचे सार्वजनिक पाणी पुरवठा अंतर्गत उद्भव विहिर व पाईप लाईन टाकण्याचे काम सन २०१७-२०१८ दरम्यान करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंदाज पत्रकातील काही मंजुर कामांच्या परिमाणात बदल झाला असल्याने त्याचा सविस्तर प्रस्ताव कारणांसह कार्यकारी अभियंता यांना उपअभियंता यांनी सादर करुन मान्यता न घेतल्याने मुळ रक्कम रु. २,६२,२४०/- नियमबाह्यरित्या प्रदान करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग १ व २ बाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी असणाऱ्या व्यक्तींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) बदल झालेल्या परिमाणानुसार सविस्तर प्रस्ताव तयार करण्यात आलेला असून सक्षम अधिकारी यांची मंजुरी घेण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया व नाशिक जिल्हयात मार्केटींग फेडरेशनकडे मिलर्सची सुरक्षा ठेव जमा असूनही मोबदला मिळाला नसल्याबाबत

**(७) * ४३६८२ श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.सहसराम कोरोटे (आमगाव) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गौंदिया व नाशिक जिल्हयात मार्केटिंग फेडरेशन व महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ यांचेकडून सन २००८-०९ ते २०२०-२०२१ पर्यंत मार्केटिंग फेडरेशनकडे मीलर्सची सुरक्षा ठेव जमा करण्यात आलेली आहे परंतू बहुतांश मिलर्सना सन २०१७-१८ ते २०२०-२१ भरडाईचा मोबदला देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने भरडाई करणा-या मिलर्सनी बारदान परत न केल्यास प्रती बारदान ३४.०० रुपये नग वसूल करण्याबाबत आदेशित केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या सदर आदेशात जुन्या की नवीन बारदानाची वसुली करण्यात यावी याबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग ३ मधील निर्देश स्पष्ट करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच सन २००८-०९ ते २०२०-२०२१ पर्यंत मार्केटिंग फेडरेशनकडे मीलर्सची सुरक्षा ठेव जमा करण्यात आलेली असूनही मोबदला न देण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ : (**१) हे अंशत: खरे आहे.

मार्केटिंग फेडरेशनमार्फत हंगाम 2008-09 ते 2019-20 (खरीप व रब्बी) तसेच पणन हंगाम 2020-21 (खरीप) मधील धान भरडाई खर्चाच्या रक्कमा मिलर्सना अदा करण्यात आलेल्या आहेत. पणन हंगाम 2020-21 (रब्बी) मधील धान भरडाई खर्चाची रक्कम अदा करणे बाकी आहे.

महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळामार्फत ज्या मिलर्सने

NEML या पोर्टलवर गिरणीमध्ये आवक धान, शासकीय पुरवठा गोदामात जावक तांदळाच्या नोंदी घेतल्या आहेत, अशा मिलर्सना मोबदला देण्यात येत आहे. पणन हंगाम 2008-09 ते 2016-17 मधील भरडाई देयके अदा करण्यात आली आहे. पणन हंगाम 2017-18 ते 2020-21 मधील एकूण रु.56.61 कोटी भरडाई खर्चाच्या रकमेपैकी रु.32.18 कोटी अदा करण्यात आले असून रु.24.43 कोटी इतकी रक्कम मिलर्सनी नोंदी पूर्ण न केल्याने अदा करणे बाकी आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

मिलर्सने जुना बारदाना परत न केल्यास रु.34/प्रति नग याप्रमाणे रक्कम वसुल करणेबाबत शासनाने स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) हंगाम 2008-09 ते 2020-21 मध्ये धान भरडाईचे अंतिम हिशोब करण्यात आलेल्या सर्व संबंधीत मिलर्सना मार्केटिंग फेडरेशनमार्फत अनामत रक्कमा व देय भरडाई मोबदला प्रदान करण्यात आलेला आहे.

(५) मिलर्सकडून जुना बारदाना परत न मिळाल्यास वसूली करण्याबाबत शासनाने निर्देश दिलेले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत भूजल मूल्यांकन करुन प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीतून रावेर तालुका वगळल्याबाबत

**(८) * ४२५२३ श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर, बोदवड व रावेर (जि. जळगाव) अशा तीन तालुक्यांतील एकूण १७४ गावे मागील काळात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत भूजल मूल्यांकन सन २०१९-२० प्रमाणे सुरक्षित वर्गवारी असलेल्या पाणलोट क्षेत्रातील भूजल वापराची टक्केवारी भूजल उपलब्धतेच्या तुलनेत ६० किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा मुक्ताईनगर तालुक्यातील १४७ गावांपैकी प्रसिध्द करण्यात आलेल्या १९ गावांच्या यादीतुन रावेर तालुक्याला वगळण्यात आले

आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूजल सर्वेक्षण विभागानुसार जळगाव जिल्ह्यातील ११०५३ गावांपैकी केवळ ३०० गावे डार्क झोनच्या बाहेर असल्याचे एका भूजल सर्वेक्षणाच्या निदर्शनात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे अपात्र गावातील केळी व बागायती शेतक-यांना वैयक्तिक लाभाच्या सिंचनाच्या योजनेचा लाभ मिळू शकत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली, केलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) मुक्ताईनगर, बोदवड व रावेर तालुक्यातील २५६ गावांपैकी भूजल मुल्यांकन सन २०१९-२०२० नुसार मुक्ताईनगर व बोदवड तालुक्यातील एकूण १७ गावे सुरक्षित वर्गवारीत (भूजल उपलब्धतेच्या तुलनेत ६०% किंवा त्यापेक्षा कमी उपसा) तर १२० गावे अंशतः शोषित (भूजल उपलब्धतेच्या तुलनेत ७०% ते ९०% उपसा) वर्गवारीत मोडत आहेत. तर रावेर तालुक्यातील ११९ गावे अतिशोषित (भूजल उपलब्धतेच्या तुलनेत १००% वा अधिक उपसा) वर्गवारीत मोडत आहेत.

(२) जळगांव जिल्ह्यातील एकूण १५३५ गावांपैकी सुरक्षित पाणलोट वर्गवारीत एकूण ४१३ गावांचा समावेश आहे. या ४१३ गावांपैकी भूजल उपलब्धतेच्या तुलनेत ६०% किंवा त्यापेक्षा कमी उपसा असलेली ३०२ गावे असून, भूजल उपलब्धतेच्या तुलनेत ६०% ते ७०% मधील भूजल उपसा असलेल्या १११ गावांचा समावेश आहे.

(३) होय हे खरे आहे.

नियोजन (रोहयो) विभागाच्या दि. १७ डिसेंबर, २०१२ रोजीच्या शासन निर्णयानुसार अंशतः शोषित, शोषित, अति शोषित क्षेत्रामध्ये वैयक्तिक लाभाच्या सिंचन विहिरी घेवू नयेत. मात्र अंशतः शोषित या पाणलोट क्षेत्रात समूह विहिरी हाती घेता येवू शकतात. केंद्र शासनाच्या पंतप्रधान कृषी सिंचन योजनेच्या निकषानुसार अंशतः शोषित, शोषित, अति शोषित या क्षेत्रात व

सुरक्षित क्षेत्रातील, ज्या क्षेत्रात भूजल उपश्याची टक्केवारी ६०% पेक्षा जास्त आहे अशा सर्व क्षेत्रात नवीन सिंचन विहीर घेता येत नाही. तथापि, सुरक्षित क्षेत्रातील ६० ते ७०% या उपश्याच्या वर्गवारीतील क्षेत्रात पुनर्भरण उपाय योजना करण्याच्या अटींवर नवीन सिंचन विहीर घेण्यास शिफारस करण्याच्या सूचना संचालनालयाच्या दि. २९.०६.२०२१ च्या पत्रान्वये प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सर्वांना दिल्या  आहेत.

(४) केंद्रीय भूजल मंडळाने तयार केलेल्या भूजल अंदाज समिती सन २०१५ च्या कार्यप्रणालीनुसार राज्य शासनाच्या भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा व केंद्रीय भूजल मंडळ यांच्या सहकार्याने संयुक्तपणे केलेल्या सर्वेक्षणानुसार भूजल मुल्यांकनाची कार्यवाही केलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागात नविन पाणी पुरवठा योजनेच्या तांत्रिक मान्यतेचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(९) * ४२६७७ डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हा परिषद स्तरावर पाणी पुरवठा विभागामार्फत जलजीवन मिशन अंतर्गत ४५० गावांच्या नवीन पाणी पुरवठा योजनेचे अंदाजपत्रक तांत्रिक मान्यतेसाठी प्रलंबित असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलजीवन मिशनअंतर्गत २ कोटी रुपयापर्यंत पाणी पुरवठा योजनांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार शासनाने पाणी पुरवठा विभागाच्या संबंधित कार्यकारी अभियंत्याना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नांदेड जिल्हापरिषदेच्या पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता हे तांत्रिक मान्यता देण्यास जाणीवपुर्व टाळाटाळ करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कर्तव्यात कसूर करुन तांत्रिक मान्यता देण्यास टाळाटाळ करणाऱ्या संबंधित कार्यकारी अभियंत्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) होय हे खरे आहे.

(३) व (४) हे खरे नाही. शासन परिपत्रकान्वये कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद स्तरावरील समिती रु. २.०० कोटी पर्यंतच्या प्रस्तावांची छाननी समितीमार्फत करून त्यांनतर तांत्रिक मान्यता प्रदान करते. नांदेड जिल्ह्यात जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत एजन्सी मार्फत तयार करण्यात आलेली तालुका स्तरावर छाननी करून प्रस्तावासोबत आवश्यक ती प्रपत्रे जोडूनच विभागास सादर केली जातात. त्यानुसार तालुका स्तरावर प्राप्त ३९१ अंदाजपत्रकापैकी तालुका स्तरावरुन सदरील बाबींची पुर्तता करुन माहे जानेवारी व फेब्रुवारी, २०२२ मध्ये नांदेड जिल्हा परिषदेचे विभागीय स्तरावर २२० अंदाजपत्रके मान्यतेस्तव प्राप्त झाली. पैकी १६५ योजनांना तांत्रिक मान्यता प्रदान केली असून ५५ योजनांची अंदाजपत्रकांची तांत्रिक तपासणी जिल्हा परिषद स्तरावर सुरु आहे. व उर्वरित १७१ अंदाजपत्रके तालुका स्तरावरून तांत्रिक तपासणी करून सर्व प्रपत्रासह प्राप्त होणे बाकी आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील बोरिवली (पूर्व) येथील मे.एनक्लायनप रिऍलिटी प्रा.लि. कंपनीमुळे होत असलेल्या प्रदूषणाबाबत

**(१०) * ४३४७१ श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरिवली (पूर्व), मुंबई उपनगर, हायवे वरील, मागाठाणे जवळ असलेल्या मे.एनक्लायनप रिऍलिटी प्रा.लि. (ऑबेरॉय बिल्डर्स) या कंपनीमुळे परिसरात

होणारे हवेचे प्रदूषण तसेच सदर कंपनीच्या आर.एम.सी प्लांटला दिलेल्या एनओसीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ जानेवारी, २०२० रोजी पासून वारंवार प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे :** (१) होय हे खरे आहे.

यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींकडून दिनांक २६ फेब्रुवारी २०२० व दिनांक ०३ मार्च २०२० रोजी पोर्टल द्वारे तक्रार प्राप्त झाली असल्याचे महाराष्ट्र प्रदूषण नियत्रंण मंडळाने नमूद केले आहे..

(२) तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून पाहणी दरम्यान, बांधकाम प्रकल्प व आरएमसी रेडीमिक्स प्लांटमध्ये आढळलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने, इंनक्लाईन रियालिटी (बांधकाम प्रकल्प), इंनक्लाईन रियालिटी (रेडीमिक्स प्लांट प्रकल्प) व नुवोको विस्तास कार्पोरेशन लिमिटेड (रेडीमिक्स प्लांट प्रकल्प) या उद्योगांना दिनांक ०६ मार्च २०२० रोजी प्रस्तावित निर्देश देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उध्दभवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्हयातील पाणी नमुने दूषित असल्याबाबत

**(११) * ४२१५२ श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील १४ तालुक्यामधील पाण्याचे १ हजार ६८३ नमुने तपासण्यात आले असता त्यातील ४९ गावातील ५५ नमुने दूषित असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे

आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील सर्वाधिक दूषित पाण्याचे नमुने पाथर्डी तालुक्यात आढळून आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभाग व भुजल विभागाकडून तपासण्यात आलेल्या पाण्याचे दूषित नमुने आढळलेल्या ग्रामपंचायतींना सुचना देवून हे दूषित पाणी शुध्द व निर्जतूंक करण्यासाठी उपाययोजना केल्या जातात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हयातील एवढया मोठया प्रमाणात पाण्याचे नमुने दूषित आढळण्याची कारणे काय आहेत तसेच सर्वाधिक दूषित पाणी नमुने आढळलेल्या पाथर्डी तालुक्यातील १२ गावातील दूषित पाण्याला शुध्द व निर्जतुंक करण्यासाठी विभागामार्फत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) अहमदनगर जिल्हयातील पाथर्डी तालुक्यात सर्वाधिक म्हणजे एकूण ३९५ पाणी नमुने तपासण्यात आले असून त्यापैकी १२ पाणी नमुने दूषित असल्याचे आढळून आले आहेत.

(३) हे खरे आहे.

दुषित आलेल्या पाणी नमुन्याचा अहवाल संबंधित पंचायत समित्यांना योग्य त्या उपाय योजना करण्यासाठी पाठविण्यात येतो.

(४) दरमहा पाणी नमुने अहवाल व टिसीएल नमुने तपासणी अहवाल सर्व संबंधित गटविकास अधिकारी यांना पाठविण्यात येवून दूषित नमूने आढळून आलेल्या स्त्रोतांवर टीसीएलद्वारे शुध्दीकरण करण्यात येते. तसेच ज्या कारणांमुळे पाणी दुषित होते, ते शोधून तात्काळ त्या त्रुटींची पुर्तता ग्रामपंचायतीकडून केली जाते. पाथर्डी तालुक्यात १२ दुषित पाणी नमुने आढळून आलेल्या स्त्रोतांचे टीसीएल द्वारे शुध्दीकरण करून सदर पाणी नमुने तात्काळ फेरतपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले. माहे डिसेंबर २०२१ मधील दुषित आलेले ५५ पाणी नमुने उपाययोजना करून फेरतपासणीसाठी पाठविले असता तपासणी अंती योग्य आढळून आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीच्या सदस्य सचिवांना सोयी-सुविधा पुरविणेबाबत

**(१२) * ३९७९३ श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जागतिक दर्जाचे लेखन आणि भाषणे संपादीत करुन प्रकाशित करण्यासाठी शासनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीची ४० वर्षापूर्वी स्थापना केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकरीता साहित्याची निवड करणे, प्राधान्यक्रम ठरवणे, पुस्तकांवर संपादकीय संस्कार करणे आदि महत्वाच्या कामाची जबाबदारी चरित्र साधने प्रकाशन समितीच्या सदस्य सचिवांवर सोपविण्यांत आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समितीच्या सदस्य सचिवांना महिन्याला केवळ १० हजार रुपये इतक्याच अल्प मानधनावर काम करावे लागत असल्याचे व ठरविण्यात आलेले मानधन गत अनेक महिन्यांपासून त्यांना मिळाले नसल्याचे तसेच सदस्य सचिवांना राहण्यासाठी शासकीय निवासस्थान आणि वाहन व्यवस्था नसल्यामुळे स्वखर्चाने मुंबईत राहून काम करावे लागत असल्याचेही दिनांक ०८ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीची स्थापना दिनांक १५ मार्च, १९७६ रोजी झाली आहे, हे खरे आहे.

(२) होय.

(३) या विभागाच्या दिनांक १३ एप्रिल, २०१० रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सदर समितीच्या सदस्य सचिवांना दरमहा रु१०,०००/- (रुपये

दहा हजार) मानधन देण्यात येते. सदर समितीच्या कामकाजासाठी सदस्य सचिवांना पुरेशा सुविधा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता निदर्शनास आली आहे. (४) समितीच्या सदस्य सचिवांना आवश्यक सुविधा उपलब्ध करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## परळी औष्णिक विद्युत केंद्रातील (जि.बीड) राखेमुळे होत असलेले प्रदुषण

**(१३) * ४३६१३ श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी औष्णिक विद्युत केंद्रातून (जि.बीड) बाहेर पडणाऱ्या राखेची व्यवस्थित विल्हेवाट लावली जात नसल्याने या परिसरात राखेचे कण दिवस-रात्र हवेत राहत असल्याने धुक्याप्रमाणे राखेची चादर तयार होत असल्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परळी औष्णिक विद्युत केंद्रात तयार होणाऱ्या राखेची व्यवस्थित विल्हेवाट लावण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (गंगाखेड) यांनी मा.पर्यावरण मंत्री यांना दिनांक १४ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही / उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे :** (१) हे अंशत: खरे आहे.

परळी औष्णीक विदयुत केंद्रातून केंद्रातून बाहेर पडणाऱ्या राखेमुळे जनतेच्या आरोग्यावर परिणाम झाल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत नसल्याचे वैद्यकीय अधिक्षक, वर्ग - १ जिल्हा रुग्णालय परळी यानी दिनांक ०४.०३.२०२२ च्या पत्रात नमुद केले आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

सदर निवेदन दिनांक १४.०३.२०२२ रोजी विभागात प्राप्त झालेले असून पुढील कार्यवाहीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियत्रंण मंडळाकडे दिनांक १४.०३.२०२२ रोजी पाठविण्यात आलेले आहे. तसेच यापुर्वी प्राप्त तक्रारीच्या अनुषगाने महाराष्ट्र प्रदूषण नियत्रंण मंडळाने दिनांक २२.१२.२०२१ रोजी पाहणी केली. पाहणी दरम्यान आढळून आलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने औष्णीक केंद्रास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्हयात प्लास्टीक पिशव्यांचा वापर होत असल्याबाबत

**(१४) * ४३५२० श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तीन वर्षापूर्वी शासनाने प्लास्टिक बंदीचा आदेश जारी केला असतांनाही सांगली जिल्हयात व्यावसायिक, मॉल्स, रस्त्यावरील किरकोळ विक्रेते तसेच खरेदीदारही प्लास्टिक पिशव्यांचा वापर करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करुन प्लास्टिक पिशव्यांचा वापर करणा-यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दि.२३ मार्च २०१८ रोजी महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकॉल अविघटनशिल वस्तुंचे ( उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक ) अधिसूचना २०१८ प्रसिध्द करण्यात आली. तद्नंतर सुधारीत अधिसूचना दिनांक ११ एप्रिल २०१८, ३० जून २०१८ व १४ जून २०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

उपरोक्त अधिसूचनेतील तरतुदींच्या अंमलबजावणी व नियमांतर्गत कारवाई करणेसाठी राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थासह विविध विभागाचे अधिकारी / शासकीय संस्था तसेच, रेल्वे, मेट्रो व विमानतळ प्राधिकरण अशा एकूण १४ विविध विभागांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे. तसेच प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने महाराष्ट्रातील सर्व २७

महानगरपालिकांना दिनांक १६.०७.२०१८, दिनांक ०१.१०.२०१८ व दिनांक ०१.१२.२०२० रोजी निर्देश दिले आहेत.

सांगली जिल्ह्यामध्ये कार्यरत असणाऱ्या महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत यांच्या कार्यक्षेत्रात किरकोळ व घाऊक व्यापारी यांच्या दुकांनांची पाहणी करुन १६६ प्लास्टिक पिशव्यांचा वापर व विक्री करणा-या विक्रेत्यांवर रक्कम रु. ३,१८,५००/- इतका दंड वसूल करुन १,९५१ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**उंबर्डे (ता.पेण, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील धोंडपाडा येथील रास्तभाव दुकानातून निकृष्ट दर्जाच्या धान्याचे वाटप केल्याबाबत**

**(१५) * ४०८३३ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंबर्डे (ता.पेण, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील धोंडपाडा येथील रास्तभाव दुकानात लाभार्थींना वाटप करण्यात आलेले प्रत्येकी २० किलो धान्य निकृष्ट दर्जाचे व आरोग्यास घातक असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विभागातील रास्तभाव धान्य दुकानातील वितरित केलेल्या लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या धान्यामध्ये मेलेले उंदीर, पाल व कोंबडीची पिसे आढळून आल्याचे ग्रामस्थांनी संबंधीत पुरवठा विभागाच्या अधिका-यांच्या निदर्शनास आणून दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तालुक्यात अनेक रास्तभाव धान्य दुकानात अश्याच प्रकारचे निकृष्ट व आरोग्यास घातक असलेले धान्य वितरीत केले जात असल्याच्या तक्रारी करूनसुद्धा संबंधीत विभागाच्या अधिका-यांच्या दुर्लक्षामुळे येथील रास्तभाव धान्य दुकानदार निकृष्टदर्जाचे धान्य वितरीत करीत आहेत,

हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पेण तालुक्यातील निकृष्ट धान्य वितरीत करणा-या रास्तभाव धान्य दुकानदारांवर व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधीत विभागातील अधिकारी/कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१), (२) व (३) दैनिक पुढारी या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने दि. २८.०१.२०२२ रोजी मौजे धोंडपाडा येथील रास्तभाव दुकानास भेट देऊन धान्याची प्रतवारी तपासली असता ते निकृष्ट असल्याचे आढळून आले नाही. गृहभेटी अंती घेण्यात आलेल्या ग्रामस्थांच्या जबाबामध्ये त्यांनी निकृष्ट धान्य प्राप्त झाले नसल्याचे नमूद केले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यातील पाणी पुरवठा योजनांची थकीत वीज देयके गौण खनिज व मुद्रांक शुल्क परतावा निधीमधुन अदा करणेबाबत

**(१६) * ४२३३६ श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यातील ढोके, पोसरी, शेलारपाडा, नाऱ्हेन, नेवाळी या ग्रामपंचायतीमध्ये मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेअंतर्गत निधी मंजुर असून अनेक गावांमधील पाणी पुरवठा योजनांची विज देयके व महाराष्ट्र आद्योगिक विकास महामंडळाची पाणी पट्टी देयके थकीत असल्यामुळे या गावांमध्ये मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेतुन कामे सुरु होऊ शकली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, थकीत पाणी पुरवठा वीज देयकांवरील दंड व व्याज माफ केले तरी सदर ग्रामपंचायती वीज देयके भरु शकत नसल्याने मुळ देयके भरण्यासाठी गौण खनिज व मुद्रांक शुल्क परतावा निधीमधुन आर्थिक मदत देण्याची मागणी नागरिक व लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ग्रामपंचातींची पाणी पुरवठायोजनांची थकीत विज देयके व महाराष्ट्र आद्योगिक विकास महामंडळाची पाणी पट्टी देयके गौण खनिज व मुद्रांक शुल्क परतावा निधीमधुन अदा करणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

अंबरनाथ तालुक्यातील पोसरी, शेलारपाडा, नाऱ्हेन, नेवाळी ही गांवे मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत सन २०१७-१८ मध्ये समाविष्ट करुन प्रस्ताव तयार करण्यात आले होते. वाढीव लोकसंख्ये करिता ग्रामपंचायतीला महाराष्ट्र आद्योगिक विकास महामंडळाकडुन नळ जोडणीला मंजुरी मिळाली नाही. त्यामुळे सदर गांवांची मुख्यमंत्री पेयजल योजने अंतर्गत कामे करता आलेली नाहीत. तसेच सदरचे गावे जल जीवन मिशन योजने अंतर्गत समाविष्ट करण्यात आलेली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १५८ अन्वये जिल्हा परिषदांना देय असलेल्या मुद्रांक शुल्क नेवाळी, पोसरी, नाऱ्हेन या ग्रामपंचायतींना सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ अखेर प्राप्त निधीपैकी एम.आय.डी.सी. कडील पाणी पट्टीतील देयकांची रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुरुंडी (ता.आरमोरी, जि.गडचिरोली) येथील शेतकऱ्यांना बारदानाची रक्कम मिळण्याबाबत

**(१७) * ४३४२४ श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था कुरुंडी (ता.आरमोरी, जि.गडचिरोली) येथे आधारभुत धान खरेदी केंद्रावर सन २०२०-२०२१ च्या पणन हंगामात बारदाने उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांनी स्वत: जवळची बारदाने देवुन धान विक्री केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन वर्षाचा कालावधी उलटूनही धान विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत बारदानांची रक्कम अदा करण्यात आली नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शेतकऱ्यांना बारदानाची रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच केलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ : (**१) व (२) हे खरे आहे.

कोविड-१९ च्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर अनेक ठिकाणी लॉकडाऊन असल्यामुळे पश्चिम बंगालमध्ये आलेल्या चक्रीवादळामुळे सर्व ज्यूट मिल बंद असल्याने, केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे ज्यूट कमिशनर, कोलकत्ता यांच्याकडे मागणी करुनही नवीन बारदानाचा पुरवठा होऊ शकला नाही. या पार्श्वभूमीवर धानाची वेळीच खरेदी होण्याकरिता आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था, कुरुंडी (ता.आरमोरी, जि.गडचिरोली) या खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांनी धानासोबत आणलेला एकदा वापरलेला बारदाना ३७३६१ नग खरेदी करण्यात आलेला आहे.

(३) व (४) गडचिरोली जिल्ह्यांतर्गत १७,४८३ शेतकऱ्यांकडून १२,९२,४७० नग एकदा वापरलेल्या बारदान्यात धानाची खरेदी करण्यात आलेली आहे.

केंद्र शासनाने मंजूर केलेल्या तात्पुरत्या दरपत्रकातील जुन्या बारदानाच्या दरापेक्षा अधिकच्या दराने मागणी असल्याने, केंद्र शासनाच्या दि.१३-१२-२०१८ च्या सूचनांप्रमाणे शेतकऱ्यांकडील वापरण्यात आलेल्या बारदानाचा परिपुर्ण प्रस्ताव सादर करणेबाबत शासनस्तरावरुन अभिकर्ता संस्थांना दि.२९-११-२०२१, दि.३०-११-२०२१, दि.०९-१२-२०२१, दि.१५-१२-२०२१ व दि.०२-०३-२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्यानुसार विहित नमुन्यातील माहिती

संकलीत करण्याची कार्यवाही अभिकर्ता संस्थांमार्फत सुरु आहे.

-----------------

## मौजे रुईभर (जि.उस्मानाबाद) येथे मिरची पावडरमध्ये भेसळ झाल्याबाबत

**(१८) * ४३९५७ डॉ.तानाजी सावंत (परांडा) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे रुईभर (जि.उस्मानाबाद) येथील मिरची पावडर उत्पादनांची तपासणी करुन ते नमुने प्रयोगशाळेकडे पाठविलेले असता त्याचा अहवाल प्राप्त झाला असून सदर अहवालात शरीरास अपाय करणाऱ्या रंगाची भेसळ केल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद जिल्हयातील अन्न पदार्थाचे नमुने औरंगाबाद, सोलापूर येथील प्रयोगशाळेकडे तपासणीस जात होते परंतू ती प्रयोगशाळा मागील दिड वर्षापासून बंद आहे त्यामुळे आता पुणे येथील प्रयोग शाळेकडे नमुने तपासणीस पाठविले जात आहेत त्या ठिकाणी ३ ते ४ महिन्यांचा कालावधी लागतो आणि तिथून पुन्हा म्हैसूर येथील प्रयोगशाळेकडे तपासणीस पाठवावे लागतात या ठिकाणाहून अन्न प्रशासनाकडे अहवाल येण्याकरीता किमान वर्षभराचा कालावधी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अहवाल येण्यास लागणाऱ्या प्रदिर्घ कालावधीचा फायदा घेऊन अश्या प्रकारचे गुन्हे करण्याचे धाडस व्यापाऱ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी दोषी असणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण यांच्या दि. १८.१२.२०२० रोजीच्या

पत्रानुसार महाराष्ट्रातील १३ सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळांपैकी १२ सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा Discontinue केल्यापासून उस्मानाबाद जिल्ह्यातील नमुने औरंगाबाद, सोलापूर ऐवजी राज्य आरोग्य प्रयोगशाळा, पुणे येथे पाठविण्यात येत होते. सदर अन्न नमुने विश्लेषणाचा अहवाल येण्यासाठी सर्वसाधारणपणे २ महिन्यांचा कालावधी आणि जर अन्न व्यावसायीकाने अपील केल्यास व नमुन्याचा दुसरा भाग म्हैसूर येथील रेफरल प्रयोगशाळेकडे पाठविल्यास सर्वसाधारणपणे २ महिन्याचा कालावधी लागतो.

(३) हे खरे नाही.

(४) मे. साई सह्याद्री फूड प्रोडक्ट्स, रुईभर, ता.जि.उस्मानाबाद येथील मिरची पावडर उत्पादकाची तपासणी करून अन्न नमुने विश्लेषणासाठी राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे येथे व म्हैसूर येथील रेफरल प्रयोगशाळेत असुरक्षित आढळून आल्याने सदर आस्थापनेविरुध्द दि. १४.०२.२०२२ रोजी मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, उस्मानाबाद यांच्या न्यायालयात खटला क्र.आरसीसी ५१/२०२२ दाखल करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) येथील बस स्थानकाचे काम संथगतीने होत असल्याबाबत

**(१९) * ४४२४८ श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) येथील बस स्थानकाचे काम मागील पाच वर्षांपूर्वी मंजूर होऊनही अद्याप प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्याने निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बस स्थानकाचे काम सुरु करण्याचा कार्यारंभ आदेश देऊन बराच कालावधी होऊनही याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार लेखी निवेदन देऊनही शहापूर बसस्थानकाचे बांधकाम संथगतीने होत असल्याने प्रवासी व जनतेमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बस स्थानकातील सुविधांचा अभाव व होत असलेल्या गैरसोयीमुळे बहुतांश प्रवासी खाजगी वाहनाने प्रवास करीत आहेत, हे ही खरे

आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बसस्थानकाच्या कामात दिरंगाई करणा-या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१), (२), (३), (४) व (५) शहापूर बसस्थानकाच्या बांधकामास जानेवारी २०१९ अखेरीस सुरुवात झाली. २०१९ मधील अतिवृष्टीमुळे तसेच मार्च २०२० पासूनचे कोरोना निर्बंधामुळे जानेवारी २०२२ पर्यंत काम मंद गतीने सुरु होते. सद्यस्थितीत काम सुरु असून बसस्थानक बांधकामाच्या प्रथम टप्प्यातील स्लॅबचे काम प्रगतीपथावर आहे. अस्तित्वात असलेल्या बस स्थानकांच्या अंशत: भागातून तसेच बस स्थानकाच्या आवारात उभारण्यात आलेल्या तात्पुरत्या शेड मधून प्रवाशी वाहतूक सुरु आहे. प्रवाशांना मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## राज्यातील पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण करणाऱ्या प्रयोगशाळांमधील कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबत

**(२०) * ४२४९८ श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्वच्छ व शुद्ध पाणी उपलब्ध करून देणाऱ्या पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळांचे खाजगीकरण करण्यासाठी शासनाकडून प्रयत्न होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रयोगशाळांचे खाजगीकरण करण्याची कारणे काय आहेत तसेच सदर प्रयोगशाळेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या बाह्यस्थ संस्थेमार्फत करण्यात येणार असल्याने राज्यातील जळगाव व इतर जिल्ह्यातील ८२० कर्मचारी बेरोजगार होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील ८२० कर्मचाऱ्यांना सेवेत कायम

करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत राज्यात सध्या एकूण १८३ प्रयोगशाळा मंजूर असून त्यापैकी ६ विभागीय,२८ जिल्हा व १४३ उपविभागीय अश्या एकूण १७७ प्रयोगशाळा कार्यरत आहेत. या प्रयोगशाळांचे खाजगीकरण करण्याचे कोणतेही प्रयत्न शासनामार्फत सुरू नाहीत.

शासनाच्या दि. ०४ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या जल जीवन मिशन कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार केंद्र शासनाने सुचविलेल्या मनुष्यबळाव्यतिरिक्त आवश्यकतेप्रमाणे अन्य मनुष्यबळ बाहय संस्थेद्वारे उपलब्ध करून घेण्याचे निर्देश आहेत.

(३) भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या अधिनस्त प्रयोगशाळातील पदे बाह्यंत्रणेद्वारे भरण्याच्या शासनाच्या आदेशाविरूध्द ५१४ कंत्राटी कर्मचा-यांनी दाखल केलेली रिट याचिका क्र. १३८४७/२०२१, मा.उच्च न्यायालयाच्या दि.०७.०१.२०२२ रोजीच्या आदेशान्वये बाह्ययंत्रणेद्वारे पदभरतीच्या प्रक्रियेस स्थगिती देण्यात आलेली आहे. तसेच मा. उच्च न्यायालयाच्या दि.१२.०१.२०२२ रोजीच्या आदेशान्वये याचिकेचा निकाल लागेपर्यंत कर्मचा-यांवर कोणतीही सक्तीची कार्यवाही करू नये व कोणतेही मानधन वा आर्थिक भरपाई देवू नये असे नमूद केले आहे. सदर याचिकेसंदर्भात पुढील सुनावणी दि. ३१.०३.२०२२ रोजी नियोजित आहे. मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांच्या पुढील आदेशास अनुसरून सदर प्रकरणी कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील समग्र शिक्षा अंतर्गत विविध पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत

**(२१) * ४३९५८ श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना प्रत्येक आर्थिकवर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये दहा टक्के वाढ देण्याचे

सुचविले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१९ पासून समग्र शिक्षा अंतर्गत विविध पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ न झाल्याने त्यांना आर्थिक समस्या निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) हे खरे आहे.

तथापि, केंद्र शासनाकडून सन २०१९-२०२० पासून या कर्मचाऱ्यांचा मानधन वाढीच्या प्रस्तावास मान्यता प्राप्त झालेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या संशोधन केंद्रांनी पीएचडी व एमफिल अभ्यासक्रमासाठी अतिरिक्त शुल्क आकारल्याबाबत

**(२२) * ४०३४८ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पुणे विद्यापीठाने पीएचडी व एमफिल अभ्यासक्रमासाठीचे शुल्क निश्चित केल्याची माहिती माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे विद्यापीठाशी संलग्न काही संशोधन केंद्रांनी निर्धारित विहित केलेल्या शुल्क रचनेपेक्षा जादा शुल्क आकारण्यात येत असल्याच्या

तक्रारी विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाकडे विद्यार्थी संघटनांमार्फत प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे विद्यापीठाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा विद्यार्थ्यांकडून अतिरिक्त शुल्क आकारण्यात येत असलेल्या मान्यताप्राप्त पीएचडी व एमफील संशोधन केंद्रांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, जादा शुल्क आकारणी केलेल्या विद्यार्थ्यांना शुल्काचा परतावा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत** : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे. तथापि, पालक, विद्यार्थी व इतर माध्यमांद्वारे तोंडी तसेच लेखी स्वरुपात विशिष्ट संशोधन संस्थेचा उल्लेख न करता अशा तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

(३) विहित केलेल्या शुल्क रचनेपेक्षा अधिक शुल्क आकारल्यास संबंधित संस्थेचे संशोधन केंद्र बंद करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल, असे विद्यापीठाचे परिपत्रक क्र.पीजीएस/311, दि.12.11.2021 अन्वये कळविले आहे.

(४) कोणत्याही संशोधन केंद्राने अतिरिक्त शुल्क आकारल्याबाबतची ठोस माहिती प्राप्त झाली नसल्यामुळे शुल्काचा परतावा देण्याबाबतचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीबाबत

**(२३) * ४२४२० श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील एक हजार नऊशे पदवीधर अंशकालीन कर्मचारी यांची शासनाच्या दिरंगाईमुळे थेट नियुक्ती करण्यात आलेली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे

काय,

(२) असल्यास,त्यानुसार सदरहू पदवीधर अंशकालीन कर्मचारी यांची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक :** (१) हे खरे नाही.

नांदेड जिल्हयात पदवीधर अंशकालीन उमेदवारांचा नोंदणीपट १९४० आहे.

(२) कंत्राटी पध्दतीवर थेट नियुक्तीबाबत शासन परिपत्रक दि.०२ मार्च, २०१९ नुसार जिल्हाधिकारी, नांदेड यांचे अध्यक्षतेखाली दि.२०/०८/२०१९, दि.०६/०९/२०२१ व दि.२६/०७/२०२१ रोजी बैठका घेण्यात आल्या. सर्व खाते प्रमुखांना /आस्थाप्रमुखांना दि.२४/११/२०२१ च्या पत्रान्वये सूचना दिल्या आहेत. महिला व बालविकास विभागाच्या व अन्न व औषध प्रशासन यांच्या कडील जागांसाठी १६१७ एवढया अंशकालीन उमेदवारांची यादी पाठविण्यात आली आहे.

सा.प्र.वि.च्या शासन परिपत्रक दि.२७.१०.२००९ नुसार १०% सुशिक्षित बेरोजगारांना (एकूण २५) समांतर आरक्षणानुसार नियुक्ती मिळाली आहे.

(३) प्रश्न उद्भभवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्हयातील निजामकालीन शाळांची निधी अभावी झालेली दुरवस्था

**(२४) * ४४०७९ श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात जिल्हा परिषदेच्या २१३१ प्राथमिक शाळा आहेत तर त्यापैकी १४४ निजामकालीन शाळा आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळांमधील १७३ वर्गखोल्या मोडकळीस आल्या असून अन्य शाळांच्या वर्गखोल्यांची दूरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निजामकालीन शाळांच्या दुरुस्तीकरिता सुमारे २० कोटी

रुपये इतक्या निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर शाळांच्या दुरुस्तीकरिता निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) औरंगाबाद जिल्ह्यातील निजामकालीन शाळांच्या पुनर्बांधणी व दुरुस्तीसाठी रु.8 कोटी 87 लक्ष इतका निधी उपलब्ध करुन दिलेला असून वर्ग खोल्यांची निकड व निधीच्या उपलब्धतेनुसार जिल्हा वार्षिक योजना, जिल्हा परिषद सेस फंड, आमदार-खासदार निधी, चौदावा/पंधरावा वित्त आयोग व सी.एस.आर इत्यादी माध्यमांतून वर्गखोल्यांच्या बांधकाम/दुरुस्तीची तजवीज केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दारव्हा रोड वरील (यवतमाळ शहर) शासकीय धान्य गोदामात तुरडाळ व मका पडून राहिल्याने खराब झाल्याबाबत

**(२५) * ४३७६५ श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ शहरातील दारव्हा रोड वरील शासकीय धान्य गोदामामध्ये धान्याची अफरातफर करण्यात येत असून संबंधीत अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे शासनाची सुमारे दोनशे क्विंटल तुरडाळ व पाचशे क्विंटल मका गोदामामध्ये खराब झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धान्याची प्रयोग शाळेत तपासणी केली असता तुरडाळ व मका हे मानवास व पशुपक्षास खाण्यास अयोग्य असल्याचे प्रमाणित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यवतमाळ शहर व तालुका स्तरावरील रास्त भाव धान्य दुकानदारांना पॉस मशिनमध्ये ऑनलाईन टाकण्यात आलेला मका काढून विक्री

दाखवावी तसेच वास्तविक रास्त भाव धान्य दुकानात मका नसून त्या व्यतिरिक्त गहू ग्राहकास देण्यात यावे व पॉस मशिनमध्ये मका विक्री केल्याचे दाखविण्याची सक्ती दुकानदारांना करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना पत्राव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांची चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

राज्यात कोविड-१९ ची पहिली लाट त्यावेळी मोठया प्रमाणात आली असल्याने एका जिल्हयातून दुसऱ्या जिल्हयात जाण्याकरीता निर्बंध टाकण्यात आले होते. सबब वाहने व हमाल यांची उपलब्धता फार कमी प्रमाणात असल्याने प्राथम्याने केवळ अन्नधान्याचीच वाहतूक केली जात होती. त्यामुळे सदर तुरडाळीची उचल तात्काळ होऊ शकली नाही. परिणामत: जास्त काळ साठवणूक झाल्याने ती तूरडाळ खराब झाली असल्याचे निदर्शनास आले आहे.

प्रदीर्घकाळ साठवणुकीमुळे १९८.०० क्विंटल तुरडाळ मानवास व पशुपक्ष्यानी खाण्यास अयोग्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र प्रयोगशाळेकडून प्राप्त झाले आहे. तसेच ४९६.७८ क्विंटल मकाचे नमुने प्रयोग शाळेकडे पाठविण्याची प्रक्रीया सुरू आहे.

(३) भरडधान्याची ज्या जिल्हयामध्ये खरेदी किंवा उपलब्धता असेल त्याच जिल्हयामध्ये वितरण करण्याची प्रचलित पद्धत आहे. त्यानुषंगाने जिल्हा पुरवठा कार्यालय यवतमाळ यांच्या मागणीनुसार ई-पॉस मशिनवर भरडधान्याचे वितरण करण्यात आले आहे.

(४) हे खरे आहे.

(५) स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्याबाबत मा.विभागीय आयुक्त अमरावती विभाग अमरावती यांनी दि.04.02.2022 अन्वये उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय,

वाशिम यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत केली होती. सदर समितीचा अहवाल दि.21.03.2022 रोजी प्राप्त झाला असून त्यानुसार जिल्हा पुरवठा अधिकारी, यवतमाळ तहसिलदार, यवतमाळ, निरीक्षण अधिकारी व गोदाम व्यवस्थापक, शासकीय गोदाम, यवतमाळ हे सकृतदर्शनी दोषी आढळून येत असल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार दोषी आढळून आलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांचेविरूध्द नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंबाजोगाई (जि.बीड) येथील शासकीय धान्य गोदामात झालेल्या गैरकारभाराबाबत

**(२६) * ४२६२८ श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील शासकीय धान्य गोदामामधून धान्याची पोती कमी वजनाची दिली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीवरून स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ जानेवारी, २०११ रोजी वा त्या सुमारास अंबाजोगाई (जि.बीड) येथील शासकीय धान्य गोदामास तहसीलदार व नायब तहसीलदार पुरवठा यांच्या उपस्थितीत प्रत्यक्ष भेट दिली असता गोदामातील धान्याच्या ६० पैकी प्रत्येक पोत्यामध्ये दोन ते साडे तीन किलो माल कमी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यावेळी तहसीलदार यांनी तातडीने गोडाऊन सील करून चौकशी समितीमार्फत तपासणी करणे आवश्यक असतानां स्थानिक लोकप्रतिनिधींनी तक्रार केल्यानंतर पंधरा ते वीस दिवसांनी गोडाऊनची तपासणी करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दरम्यानच्या काळात कमी असलेले पोते हमालामार्फत व्यवस्थित भरून व त्यानंतर पुरवठा विभागाने समिती नेमून चौकशी केली

असल्याने याप्रकरणी संबंधितांना तहसीलदार यांच्याकडून संरक्षण देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे अहो काय,

(५) यास्तव, उक्त प्रकरणी तातडीने कार्यवाही करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांच्याकडे दिनांक १४ नोव्हेंबर, २०२१ व दिनांक ०७ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली असून त्यानुसार उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ :** (१) व (२) हे खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.१४/११/२०२१ रोजी अंबाजोगाई, जि. बीड येथील शासकीय धान्य गोदामास तहसिलदार व नायब तहसिलदार, पुरवठा यांच्या उपस्थितीत भेट दिली. त्यावेळी गोदामातील ६० धान्याच्या पोत्यांचे चाचणी वजन घेतले असता ते ४७.२० ते ४८ किलो असल्याचे निदर्शनास आले.

(३) दि. १४/११/२०२१ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी भेट दिल्यानंतर तहसिलदार, अंबाजोगाई व नायब तहसिलदार (पुरवठा), अंबाजोगाई यांनी त्याच दिवशी इन कॅमेरा संपुर्ण शासकीय धान्य गोदाम अंबाजोगाई मधील वेगवेगळ्या थप्पी मधील १५५ गव्हाचे पोते व १५१ तांदळाचे पोते यांचे चाचणी वजन केले व एकूण शिल्लक तपासली असता त्यावेळी गोदामातील शिल्लक धान्यसाठा यात मेळ दिसून आला.

(४) हे खरे नाही.

तथापि कोणतीही शंका राहू नये म्हणून तहसिलदार, अंबाजोगाई यांनी दि.१५/११/१०२१ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांचेकडे शासकीय धान्य गोदाम अंबाजोगाई येथे तपासणी करण्याची विनंती केली. त्यास अनुसरून जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, बीड यांचेकडील आदेश दि.०३/१२/२०२१ अन्वये उपविभागीय अधिकारी, परळी वै. याच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करून शासकीय धान्य गोदाम अंबाजोगाई येथे १००% गोदाम संग्रह तपासणी करणेबाबत आदेश निर्गमीत करण्यात आले,

(५) जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, बीड यांचेकडील आदेश दि.०३/१२/२०२१

अन्वये उपविभागीय अधिकारी, परळी वै. यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करून शासकीय धान्य गोदाम अंबाजोगाई येथे १००% गोदाम संग्रह तपासणी करणेबाबत आदेश निर्गमीत करण्यात आले. त्यानुसार समितीने शासकीय धान्य गोदाम अंबाजोगाई येथे १००% गोदाम संग्रह तपासणीत ५.१७ क्विं. गहु व तांदुळ ९.०९ क्विं. कमी आढळून आले आहेत. सदर तुटीबाबत शासन निर्णय दि. ३१/१२/२०१३ मधील तरतुदीनुसार गोदाम रक्षक, अंबाजोगाई यांचेकडून रक्कम वसुलीची कार्यवाही अनुसरण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औंढा नागनाथ (जि.हिंगोली) शहरातील कृषी उपबाजार समिती येथे रेशनचा गहू व तांदूळ आढळून आल्याबाबत

**(२७) * ४२५९५ श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंढा नागनाथ (जि.हिंगोली) शहरातील कृषी उत्पन्न उपबाजार समितीतील गाळा क्र.११ व सौदागर कॉम्पलेक्स येथे पोलीस व महसूल अधिकारी यांनी दिनांक २४ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास छापा टाकला असता ३४० क्विंटल गहू व ३० क्विंटल तांदूळ जप्त करण्यात आला असून सदर धान्याच्या पोत्यावर "महाराष्ट्र शासन खाद्य पुरवठा" असे शिक्के आढळून आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी व्यापा-यांनी रेशनच्या धान्याचा काळाबाजार केल्याचे स्पष्ट होऊनही पोलीसांनी अद्याप गुन्हे दाखल केलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रेशनचा काळाबाजार करणा-या संबंधित दोषींची चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) हे अशंत: खरे आहे.

दि.१४ जानेवारी, २०२१ रोजी छापा टाकला असता, छाप्यात ३४० क्विंटल गहू व ३० क्विंटल तांदुळ जप्त करण्यात आले आहे. धान्याच्या पोत्यांवर “महाराष्ट्र शासन खाद्य पुरवठा” असे शिक्के आढळून आले नाही.
(२) व (३) याबाबत पोलीस व महसूल विभागाकडून धान्य काळा बाजाऱ्यातील आहे किंवा कसे याबाबत चौकशी सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## गोरेगाव पूर्व (मुंबई) येथील आरे आरटीओ कार्यालय उभारणीसाठी दिलेली परवानगी रद्द करण्याबाबत

**(२८) * ४२६९७ श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगांव (मुंबई) आरे येथे आरटीओ कार्यालय उभारण्यासंदर्भात आरेची जमीन आरटीओकडे हस्तांतरित करण्यात येऊन दिनांक ०५ फेब्रुवारी, २०२२ वा त्या सुमारास कार्यालय उभारणीसाठी निविदा जाहीर करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरे मध्ये वनसंपदेचे आणि जमिनीचे संरक्षणाचे कारण पुढे करत तत्कालीन आघाडी शासनाने सर्व बाबींचा साकल्याने विचार करून पर्यावरण तसेच अन्य बाबीबाबत तज्ञांकडून मत मागविल्या नंतर मेट्रो ३ च्या कारशेडसाठी आरे येथील जागेबाबत घेतलेला निर्णय विद्यमान महाविकास आघाडीने सरकार स्थापनेनंतर रद्द केला परंतु आता आरे येथील जैव विविधतेला गंभीर धोका असताना आरटीओ प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आरेच्या वनसंपदेचे आणि जमिनीचे संरक्षण करण्याचे काम एकीकडे सुरू असताना तसेच आरे हा पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील भाग असून येथील काही जमीनी आता राखीव वनक्षेत्र म्हणून घोषित झाले असताना येथील

पर्जन्यजल संचलन, भूजल पातळी स्थिर राहण्यासाठी होणारी जमिनीची मदत, आरे मधून उगम पावणाऱ्या दोन नद्या या पार्श्वभूमीवर आरटीओमुळे येथे वाहनांची होणारी वर्दळ आणि पर्यायाने वायू तसेच ध्वनी प्रदूषण होण्याची शक्यता असल्याचे पर्यावरणप्रेमी कार्यकर्ते व सर्व सामान्य नागरिकांनी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासाठी आरे येथील आरटीओ प्रकल्प रद्द करण्याची मागणी पर्यावरणप्रेमी, कार्यकर्ते व नागरीकांनी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री मा.परिवहन मंत्री, मा.पर्यावरण मंत्री आदींकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने आरे येथील आरटीओ प्रकल्प रद्द करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच केलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. अनिल परब :** (१) व (२) होय.

तथापि, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बोरीवली हे सन २०१५ पासून कांदरपाडा, दहिसर (प) येथे कार्यान्वित आहे. सदर कार्यालयाकरीता जागा अपुरी पडत असल्यामुळे बृहन्मुंबई दूध परिवहन सेवा, आरे दुग्ध वसाहत, गोरेगाव (पू), मुंबई येथील एम.टी.एस. डेपोची १२८४.८१ चौ.मी. इतके बांधकाम क्षेत्र व ३३००.८५ चौ.मी. इतकी मोकळी जागा भाडेतत्वावर घेण्यास शासनाने मान्यता दिली आहे. सदर जुनी इमारत बस डेपोची असून, त्याची अंतर्गत दुरुस्ती करुन कार्यालयासाठी वापर करण्यायोग्य बनविणे आवश्यक आहे. याकरीता सदर जुन्या इमारतीच्या अंतर्गत दुरुस्तीच्या बांधकामास शासन निर्णय दिनांक १६.०९.२०२१ अन्वये रु. ९१.६० लक्ष इतक्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली असून आतापर्यंत रु.८५ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

परंतू, सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारचे नवीन इमारत बांधकाम प्रस्तावित नाही.

(३) (४) व (५) आरे येथील वनसंपदेचे आणि जमिनीचे संरक्षण करणे हे पर्यावरण संवेदनशीलतेच्या दृष्टीकोनातून महत्वाचे असल्याने सदर ठिकाणी कोणतेही नवीन बांधकाम प्रस्तावित केलेले नाही.

सबब, आरे येथील उप प्रादेशिक परिवहन कार्यालय इमारतीच्या दुरुस्ती बांधकामामुळे, आरे मधून उगम पावणाऱ्या दोन नद्या, पर्जन्यजल संचलन, भूजल पातळी स्थिर राहण्यासाठी होणारी जमिनीची मदत या बाबींवर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही तसेच सदर बांधकाम दुरुस्तीमुळे कोणत्याही प्रकारचे वायू आणि ध्वनी प्रदूषण होण्याची शक्यता नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर येथे खाजगी वाहतुकदार प्रवाशांकडून अतिरिक्त भाडे आकारीत असल्याबाबत

**(२९) * ४२७७० श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूरहून विविध ठिकाणी जाणाऱ्या प्रवाशांकडून खाजगी ट्रॅव्हल्सकडून दुप्पट ते चौपट भाडे आकारले जात असून सोलापूर ते मुंबईसाठी १८०० रुपये तर सोलापूर ते पुण्यासाठी १२०० रुपये तसेच जिल्ह्यातील तालुक्याच्या ठिकाणी जाण्यासाठीही दुप्पट भाडे आकारले जात असल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य परिवहन पेक्षा किती अधिक भाडे आकारणीकरीता परवानगी दिली आहे तसेच बेकायदेशीर अधिक भाडे आकारणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्सवर परिवहन विभागाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) होय
या विषयाबाबत बातमी दैनिक लोकमत वृत्तपत्र, सोलापूर शहर वृत्तपत्रामध्ये दि.०७ जानेवारी, २०२२ रोजी प्रसिध्द झालेली आहे.

(२) व (३) शासन निर्णय, दि. २७ एप्रिल, २०१८ नुसार महाराष्ट्र राज्यातील खाजगी कंत्राटी परवाना वाहनांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या संपूर्ण बससाठी येणा-या प्रति कि.मी. भाडेदराच्या दीडपट भाडे आकारणीस परवानगी दिलेली आहे. प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाने याबाबत ०४ खाजगी बस वाहनांवर कारवाई केली आहे. त्यापैकी १ वाहनाचा दंड वसूल करण्यात आला असून इतर ३ वाहनांना वाहन प्रणालीवर काळया यादीत टाकण्यात आले आहे. परिवहन आयुक्त कार्यालयाने दिनांक २०.१०.२०२१ च्या पत्रान्वये सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना खाजगी वाहतुकदारांनी निर्धारित करण्यात आलेल्या दरापेक्षा अधिक दर आकारल्यास सदर वाहतूकदारावर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले असून त्याप्रमाणे वेळोवेळी कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिवनेरी (ता.जुन्नर,जि.पुणे) किल्यावर विकास कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३०) * ४३१६४ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवनेरी (ता.जुन्नर,जि.पुणे) किल्ल्याच्या विकास कामांसाठी मा.मुख्यमंत्री यांनी २३ कोटी रुपयांचा निधी देण्याची घोषणा सन २०२० च्या शिवजयंती दिवशी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याच दिवशी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत सदर कामाचा प्रस्ताव त्वरित सादर करण्याबाबतचे आदेश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोना महामारीमुळे उद्भवलेल्या आर्थिक संकटावर उपाययोजना करण्यासाठी नव्याने कोणतेही बांधकाम हाती घेऊ नये, कोणत्याही कामाला तांत्रिक/प्रशासकीय मान्यता देऊ नये, निविदा-कार्यारंभ आदेश देऊ नयेत असे

आदेशित करणाऱ्या दिनांक ४ मे, २०२० रोजीच्या शासन निर्णयातील अट क्र.१३ सुध्दा या प्रकल्पासाठी विशेष बाब म्हणून शिथिल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सद्य:स्थितीत किल्ल्यावर किरकोळ कामे वगळता विकास प्रकल्पातील कामांमध्ये कोणतीही प्रगती झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शिवनेरी किल्ल्यावर विकास कामे सुरु करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे :** (१) व (२) होय.

(३) होय.

(४) व (५) प्रादेशिक पर्यटन विकास योजना सन २०२०-२१ अंतर्गत पर्यटन विभाग शासन निर्णय, दिनांक ११.०२.२०२१ अन्वये शिवनेरी किल्ला (ता.जुन्नर, जि.पुणे) पर्यटन विकासाच्या रु.२३४९.३१ लक्ष रकमेच्या कामांना प्रशासकीय मान्यता देऊन सदर निधी शासन निर्णय, दि.१७.०२.२०२१ अन्वये जिल्हाधिकारी, पुणे यांना वितरीत करण्यात आला आहे. काही कामे प्रगतीत असून काही कामे निविदा प्रक्रिया स्तरावर आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्याबाहेर उच्च शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्याबाबत

**(३१) * ४०८५८ श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मूळ रहिवासी असलेले तसेच राज्याबाहेरील उच्च शिक्षण घेणाऱ्या इतरमागासवर्ग,विमुक्त जाती व भटक्या जमाती, अनुसूचित जाती तसेच विशेष मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना मागील तीन ते चार सत्रापासून शिष्यवृत्ती वाटप झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास

निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याबाहेर उच्च शिक्षण घेणाऱ्या इतरमागावर्ग,विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच विषेश मागासवर्गातील विद्यार्थ्यांचे ऑफलाईन शिष्यवृत्ती अर्ज मागविण्यात आले परंतु शिष्यवृत्ती रक्कम ऑफलाईन पध्दतीने काढण्याचे परिपत्रक बहुजन कल्याण मंत्रालयाने काढले नसल्याने या प्रवर्गातील अनेक होतकरू विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित राहीले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रवर्गातील बाहेरील राज्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे ऑफलाईन पध्दतीने स्वीकारलेले अर्ज राज्यात प्रत्येक जिल्हयास्तरावर प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील मूळ रहिवासी असलेले व राज्याबाहेरील उच्च शिक्षण घेणाऱ्या इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग व अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना यापुर्वी फ्रिशिप देण्यात येत होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार : (१**) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) शासन परिपत्रक शासन शुध्दिपत्रक निर्गमित करण्याची व परराज्यात शिक्षण घेणा-या पात्र विद्यार्थ्यांना प्रलंबीत शिष्यवृत्ती देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लोणार (ता.लोणार, जि.बुलढाणा) सरोवर विकासासाठी प्राप्त निधी शासनाच्या जाचक अटी व वेळेच्या मर्यादेमुळे खर्च न झाल्याबाबत

**(३२) * ४२६४९ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार (ता.लोणार, जि.बुलढाणा) सरोवर विकासासाठी शासनाने १६ कोटी रुपये मंजूर केले परंतु शासनाच्या जाचक अटी व वेळेच्या मर्यादेमुळे हा निधी परत जाण्याची शक्यता निर्माण झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये विकास कामांना अद्याप मंजुरी मिळाली नसून यासाठी विभागीय आयुक्त तसेच जिल्हाधिकारी यांनी इको सेन्सिटीव्ह झोनमध्ये काम करण्यास तात्काळ मंजुरी देऊन कामांना मुदतवाढ देण्याची मागणी शिवछत्र मित्रमंडळाने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोणार सरोवर येथे प्राथमिक पायाभूत सुविधा उपलब्ध होण्याकरीता प्राप्त रुपये १६ कोटीचा दिलेला निधी परत न पाठवता पायाभूत सोयीसुविधांसाठी खर्च करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे :** (१) शासन निर्णय दिनांक 21.01.2022 अन्वये लोणार सरोवर पर्यटन विकास आराखड्यातील विकास कामे करण्यासाठी रु.15.40 कोटी एवढ्या रक्कमेस मान्यता देण्यात आली असुन सदर निधी कार्यान्वयीन यंत्रणेस वितरीत करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(२) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने जिल्हाधिकारी, बुलडाणा यांना इको सेन्सिटिव्ह झोनची मान्यता प्रदान करणेकरीता दि.27.10.2021 रोजी प्रस्ताव सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंबिस्ते (ता.वाडा, जि.ठाणे) येथील जी.के.फाउंडर्स कंपनीकडून होत असलेले प्रदुषण

**(३३) * ४३६१४ श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) श्री. दौलत दरोडा (शहापूर):** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबिस्ते (ता.वाडा, जि.ठाणे) येथील प्रदूषणकारी जी.के.फाउंडर्स कंपनीला ग्रामस्थांनी विरोध केला असल्याचे माहे फेब्रुवारी,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनी मधून निघणारा धूर आणि त्यातील धातूचे कण हे मानवी आरोग्यास खूप घातक असून येथील वनसंपदेवरही त्याचा दुष्परिणाम झाल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीवर वायुप्रदूषण महामंडळाकडून तात्काळ कारवाई होण्याबाबत ग्रामस्थांनी वरिष्ठांकडे तसेच प्रदूषण महामंडळाकडे देखील अनेक लेखी तक्रारी करून सुद्धा कंपनीवर कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

आरोग्य अधिकारी, वाडा यांच्या दि. 3/3/2022 च्या अहवालनुसार धूर व धूळपासून विशेष आजारी लोकांची नोंद स्थानिक आरोग्य केंद्रात झालेली नाही. तसेच वनसंपदेवर दुष्परिणामाबाबत कोणतीही तक्रार वनसंरक्षक, जव्हार वनविभाग यांचे कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

(३) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून तक्रारीच्या अनुषंगाने सदरील उद्योगास दि. १६.१२.२१ रोजी प्रत्यक्ष पाहणी करुन पहाणीच्या वेळी आढळलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने दि. २१.१२.२०२१ रोजी अंतरिम आदेश बजावण्यात आले असून रु. एक लाखाची बँक हमी जप्त करुन दंडात्मक

कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्हयातील शिक्षण विभागातील रिक्त पदांबाबत

**(३४) * ४२८४८ डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण विभागातील एकुण ६० टक्के जागेवर अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण विभागात मोठ्या प्रमाणात अधिकारी व कर्मचा- यांची पदे रिक्त असल्याने तसेच जिल्हयातील बहुतांश शाळांमध्ये वीज देयके भरण- याकरीता पैसे नसणे, इमारती मोडकळीस आलेल्या असणे, विद्यार्थींनीना शौचालयाची व्यवस्था नसणे, आदी पायाभूत सुविधांचा अभाव असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) खरे नाही.

(४) गट अ, ब, क संवर्गाची पदे भरण्याबाबतची आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहर व उपनगर तसेच ठाणे इत्यादी शहरात वाहने जमा करण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३५) * ४३६२१ श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरातील दहिसर चेक नाका तसेच पश्चिम द्रुतगती महामार्गावरील शहरातील वाहतूकीची समस्या दिवसेंदिवस वाढत असतांनाच अनेक ठिकाणी रस्त्यावर बंद पडलेली वाहने व रस्त्यावर पार्किंग करण्यात आलेल्या वाहनांबाबत वाहतूक पोलीस चौकीत तक्रार केल्यानंतर त्यांच्याकडे पुरेशा प्रमाणात टोईंग व्हॅन उपलब्ध नसल्याने वाहने उचलून वाहतूक कोंडी दूर करण्यास विलंब होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नादुरुस्त वाहने, अनेक वर्षे बंद अवस्थेत रस्त्याच्या बाजूला बंद अवस्थेत असलेल्या दुचाकी व चारचाकी वाहनांवर कारवाई केल्यानंतर सदर वाहने ठेवण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहर व उपनगरात मुख्य व अंतर्गत रस्त्यांवर वाहने उभी करण्याकरीता वाहनतळे उपलब्ध करुन देण्यात आली असूनही प्रत्यक्ष रस्त्यांवर त्याची माहिती व सुचना फलक लावण्यात आले नसल्याने नागरीक/वाहन चालक रस्त्यावरच वाहने उभी करतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने यासंदर्भात चौकशी करुन मुंबई शहर व उपनगर, ठाणे इत्यादी मोठ्या शहरातील वाहतूक पोलीस यंत्रणेला आवश्यक टोईंग व्हॅन उपलब्ध करुन देण्यासंदर्भात तसेच कारवाई करण्यात आलेली वाहने जमा करण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

नादूरूस्त वाहने, अनेक वर्षे बंद पडलेल्या आणि रस्त्याच्या बाजूला असलेल्या दुचाकी व चारचाकी वाहनांवर कारवाई केल्यानंतर सदर वाहने ठेवण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे २५ ठिकाणे उपलब्ध करून देण्यात आली असून ती पुरेशी नाहीत.

(३) हे अंशत: खरे आहे.

मुंबई शहर व उपनगरामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेचे एकूण ३२ सार्वजनिक वाहनतळ कार्यरत असून, सदर वाहनतळाच्या ५०० मीटरच्या परिघात महानगर पालिकेमार्फत वाहनतळ दर्शविणारे बोर्ड / सूचना फलक काही ठिकाणी लावण्यात आले असून ज्या ठिकाणी असे फलक नाहीत त्या ठिकाणी ते लावण्याबाबत महानगर पालिकेस कळविण्यात आलेले आहे.

(४) बृहन्मुंबई शहरातील वाहतूक पोलीस यंत्रणेला मदत करण्याकरिता मे.विदर्भ इन्फोटेक प्रा.लि. या कंपनीमार्फत २४ दुचाकी व २२ चारचाकी, मे.जय मल्हार कंपनी यांच्या ०७ दुचाकी व २९ चारचाकी टोईंग व्हॅन पुरविण्यात आलेली असून नवीन कंत्राटदाराची नेमणूक करण्याबाबतची प्रक्रिया सुरू आहे.

तसेच ठाणे शहरातील वाहतूकीस अडथळा करणारी वाहने हटविण्याकरिता महानगरपालिका, नगरपालिका यांचेमार्फत टोईंग व्हॅन उपलब्ध करून देण्यात आली असून सदर वाहने ठेवण्याकरिता ठाणे म.न.पा., कल्याण डोंबिवली म.न.पा., उल्हासनगर म.न.पा. तर्फे जागा उपलब्ध करून देण्यात आलेल्या असून भिवंडी-निजामपूर शहर म.न.पा. व अंबरनाथ कुळगाव बदलापूर नगरपालिकेमार्फत जागा उपलब्ध करून देण्यात आलेल्या नसून याबाबत पत्रव्यवहार करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद जिल्हयातील खाजगी वाहन धारकांकडून प्रवाशांची होत असलेली आर्थिक लूट थांबविण्याबाबत

**(३६) * ४४०८५ डॉ.तानाजी सावंत (परांडा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयातील विविध आगारातून फक्त ३० टक्केच बस सुरु असल्यामुळे एसटी बसमध्ये गर्दी होत असल्यामुळे नागरीक खाजगी वाहनांचा वापर करीत असून खाजगी वाहनाधारक प्रवाशांकडून अधिक भाडे आकारुन प्रवाशांची आर्थिक लुट करीत असल्याने पुर्ण क्षमतेने एसटी बसेस सोडण्याची मागणी प्रवांशाकडून होत असल्याचे माहे १८ फेब्रूवारी, २०२२ मध्ये वा

त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत तीन महिन्यापासून एसटी कर्मचा-यांच्या संपामुळे उस्मानाबाद जिल्हयात पुर्णत: एसटी सेवा सुरु झाली नसल्यामुळे जास्त पैसे देऊन जिल्हयात प्रवाशांना खाजगी वाहनाने प्रवास करावा लागत असून जिल्ह्यातील एसटीचे रुपये ५० कोटी पेक्षाही अधिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उस्मानाबाद जिल्हयातील ग्रामीण भागातील एसटी पुर्ववत सुरु करणे तसेच खाजगी वाहन धारकांकडून प्रवाशांची होणारी लुट थांबवण्याच्या दृष्टीने शासनाकडून कोणते धोरणात्मक निर्णय घेण्यात आले आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त निर्णयानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) व (२) होय.

(३) व (४) उस्मानाबाद विभागातील वाहतूक पूर्ण क्षमतेने सूरु करण्यासाठी खाजगी कंपनीकडून ५० कंत्राटी चालकांची नियुक्ती करुन त्यांच्या मार्फत वाहतूक करण्यात येत आहे. चालक पदांतुन बढती देण्यात आलेल्या वाहन परिक्षक कर्मचाऱ्यांच्या चालक व वाहक पदांतुन वाहतुक नियंत्रक पदी बढती देण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांचा वाहक म्हणून वापर करण्यात येत आहे. तसेच मार्गतपासणी पथकामध्ये असलेले चालक यांना विभागातील आगारात पाठवून त्यांच्याकडून प्रवासी वाहतूक करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात शासन मान्यतेशिवाय शाळा सुरु असल्याबाबत

**(३७) * ४३४०५ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्राथमिक शिक्षण संचानालयाने सुचना केलेल्या यादीव्दारे शासन मान्यता न घेता राज्यात ६७४ शाळा बेकायदेशीरपणे सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राथमिक शिक्षण संचालनालयाने माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये

जारी केलेल्या परिपत्रकानुसार, शालेय शिक्षण विभागाच्या मान्यता प्रमाणपत्र शिवाय शाळा उघडल्यास किंवा शिक्षण विभागाने मान्यता काढून घेतल्यानंतरही शाळा सुरू ठेवल्यास संस्था चालकांविरोधात त्वरित कारवाई करण्याच्या सूचना राज्यातील सर्व नगरपालिका, नगरपरिषद आणि महानगरपालिका शिक्षणाधिकाऱ्यांना दिले आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई महानगरपालिका विभागात सर्वाधिक २२३ शाळा व ठाण्यात १४९ तर पालघर मध्ये १४३ शाळांनी मान्यता न घेता शाळा सुरु केल्याचे निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईत अनेक खाजगी प्राथमिक शाळा वर्षानुवर्षे आरटीई नियमानुसार कोणतीही मान्यता न घेता सुरू असल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य विद्यार्थी पालक शिक्षक महासंघाचे मुंबई अध्यक्ष श्री. नितीन दळवी यांनी केला असून या बेकायदेशीर शाळांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले आहे हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, बेकायदेशीर सुरु असलेल्या शाळांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) यु-डाईस (U-DISE) प्रणालीवरील माहितीनुसार राज्यात 674 शाळा अनधिकृत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) हे, खरे आहे.

(३), (४) व (५) शासन मान्यतेशिवाय ज्या शाळा सुरु आहेत अशा शाळांविरूद्ध बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 च्या कलम 18 (5) मधील तरतुदींनुसार व शासन निर्णय क्र.संकीर्ण-2009/(913/09)/माशि-1, दि.19/06/2010 व शासन निर्णय क्र.संकीर्ण-2020/प्र.क्र.43/20/एसएम-2, दि. 10/11/2020 अन्वये दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**पिंपळशेत खरोंडा ग्रामपंचायत हद्दीतील हुंबरण (ता.जव्हार, जि.पालघर)**

## गावामधील पाणी टंचाई दूर करणेबाबत

**(३८) * ४४१२३ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळशेत खरोंडा ग्रामपंचायत हद्दीतील साडेबाराशे वस्ती असलेल्या हुंबरण (ता.जव्हार,जि.पालघर) गावात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली असून पाण्यासाठी गावातील महिला व लहान मुलांना दीड ते दोन किलोमीटर डोंगर उतरून पाणी घेऊन पुन्हा तेवढेच अंतर चढून जावे लागत आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हंडाभर पाणी मिळवण्यासाठी महिलांना व मुलांना एक ते दीड तास मेहनत करावी लागत असून संपूर्ण दिवस पाणी आणण्याकरिता जात असल्यामुळे रोजगारही बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गावाच्या पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेकडे स्थानिक प्रशासनाकडून दुर्लक्ष करण्यात येत असल्याने जलजीवन मिशन अंतर्गत या गावाला बारमाही पाण्याची व्यवस्था करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) अशंत: खरे आहे

साधारणत: जुलै ते जानेवारी पर्यंत अस्तित्वात असलेल्या बुडकीतुन पाडयातील रहिवासी पाणी वापरतात.

परंतु सदर बुडकीची खोली व व्यास कमी असल्याने माहे फेब्रुवारी पासुन बुडकीचे पाणी कमी होते. त्यामुळे ग्रामस्थांना पाण्यासाठी डोंगरावरून खाली उतरुन डोंगरपायथ्याशी असलेल्या बुडकीतुन पाणी घेऊन जावे लागते.

(२) अशंत: खरे आहे.

(३) सदर पाडयात 15 व्या वित्त आयोग व पेसा अंतर्गत निधीतून पिण्याच्या पाण्याची विहीर बांधणे हे काम निविदा स्तरावर आहे

तसेच जल जीवन मिशन अंतर्गत सदरचा पाडा हुंबरण सह खारोंडा या गावाचा सर्व्हे करण्यात आलेला आहे व अंदाजपत्रक करण्याचे काम सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात शिधापत्रिका ऑनलाईन प्रणालीमधील त्रुटी दूर करुन सुधारणा करण्याबाबत

**(३९) * ४३८८४ श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिधापत्रिका ऑनलाईन प्रणाली सुरु करण्यात आली असल्यामुळे अन्नधान्य वितरण प्रणालीमध्ये पारदर्शकता आली असली तरी मागील काही महिन्यांपासून ऑनलाईन प्रणाली मध्ये चंद्रपूर व इतर जिल्ह्यामध्ये कपिंग लागल्यामुळे शिधापत्रिकांमध्ये नाव समाविष्ट करणे, नाव कमी करणे व योजना बदल करणे इत्यादी कामांसाठी शिधापत्रिकाधारकांना वारंवार संबंधीत कार्यालयात ये-जा करावी लागते, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शिधापत्रिकाधारकांना होणारा त्रास कमी होण्याच्यादृष्टीने ऑनलाईन प्रणाली मधील त्रुटी दूर करुन सुधारणा होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच संबंधित ऑनलाईन प्रणालीमधील यासंदर्भातील किती कामे प्रलंबित आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणाली मधील नाव समाविष्ट करणे, नाव कमी करणे, योजना बदल करणे इत्यादी सुविधा सुरळित सुरु आहेत. तथापि, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम 2013 अंतर्गत केंद्र शासनाने राज्याला 700.16 लक्ष इतका इष्टांक दिलेला आहे. सदर इष्टांकाच्या मर्यादेत दि.16.11.2018 च्या शासन निर्णयान्वये सर्व जिल्ह्यांना इष्टांक निश्चित करण्यात आला आहे. या इष्टांकाच्या मर्यादेत विहित निकषाप्रमाणे राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेच्या लाभार्थ्यांना शिधापत्रिका देण्यात येते. चंद्रपूर जिल्ह्यासाठी देण्यात आलेल्या 1,35,558 अंत्योदय अन्न योजनेच्या शिधापत्रिका व 9,62,442 प्राधान्य कुटुंब योजनेचे लाभार्थी इतका इष्टांक पुर्ण झालेला असल्यामुळे शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणालीमध्ये अंत्योदय अन्न

योजना व प्राधान्य कुटुंब योजनेच्या नविन शिधापत्रिका देणे शक्य झाले नाही.
(२) शासन निर्णय क्रमांक असूका-2021/प्र.क्र.66/नापु-22, दि.18.02.2022 चंद्रपुर तसेच इतर जिल्ह्यांना सुधारित इष्टांक देण्यात आला आहे. तसेच ऑनलाईन प्रणाली अद्ययावत ठेवण्याच्या अनुषंगाने स्वतंत्र सर्व्हर सुविधा उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही शासन स्तरावर करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वरिष्ठ व निवडश्रेणीच्या ऑनलाईन प्रशिक्षणासाठी पात्र शिक्षकांना लॉगइन आयडी आणि पासवर्ड मिळण्याबाबत

**(४०) * ४३७०४ श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शैक्षणिक, संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे तर्फे शिक्षकांच्या वरिष्ठ व निवड श्रेणीच्या प्रशिक्षण पात्र शिक्षकांना दिनांक २३ नोव्हेंबर, २०१९ ते दिनांक २३ डिसेंबर, २०१९ पर्यंत ऑनलाइन नोंदणी करण्याचे निर्देश देण्यात आले असून तसेच या शैक्षणिक उपक्रमासाठी शिक्षकांना दोन हजार रुपये प्रशिक्षण शुल्क आकारण्यात आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे तर्फे वरिष्ठ व निवड श्रेणीच्या ऑनलाईन प्रशिक्षणासाठी पात्र शिक्षकांच्या नोंदणीला तीन महिन्यांचा कालावधी होऊनही प्रशिक्षणाच्या तारखा जाहीर झालेल्या नाहीत त्यामुळे श्रेणी सुधारणेसाठी पात्र शिक्षक केवळ शिक्षण विभागाच्या दिरंगाईमुळे यापासून वंचित आहेत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हजारो शिक्षक वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी पात्र असूनही अद्याप त्यांना लॉगइन आयडी आणि पासवर्ड मिळाले नसल्याने शासनाने त्वरित प्रशिक्षण द्यावे व दोन्ही तारखा वेगळ्या ठेवाव्यात अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद यांनी मा.शिक्षण मंत्री, सहसंचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद आदींकडे केली आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

दि.२३.११.२०२१ ते ०५.०१.२०२२ या विहित कालावधीमध्ये प्रशिक्षणासाठी शिक्षकांनी प्रशिक्षण शुल्क भरुन नोंदणी करण्याचे निर्देश होते. सदर ऑनलाईन प्रशिक्षण घेण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) व (४) वरिष्ठ व निवडश्रेणी करीता पात्र शिक्षकांना प्रशिक्षण देण्याबाबत महाराष्ट्र राज्य, शिक्षक परिषद यांनी दि. १६.०२.२०२२ रोजी निवेदन सादर केले आहे, यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## जव्हार तालुक्यातील (जि. पालघर) ग्रामीण पर्यटन अंतर्गत झाप ते भोपतगड रस्त्याच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(४१) * ४४१२४ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील ग्रामीण पर्यटन अंतर्गत झाप ते भोपतगड या पर्यटन स्थळापर्यंत चार किलोमीटर अंतरासाठी रस्ता तयार करणे, सुशोभिकरण करणे, रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे, संरक्षक भिंत बांधणे तसेच दिशादर्शक फलक लावणे इत्यादी कामांसाठी सुमारे दीड कोटी

रुपये गत दोन वर्षात खर्च करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दीड कोटी रुपये खर्च करुनही झाप ते चिंचपाडा या रस्त्याची दूरवस्था झाली असून या रस्त्यावर दिशादर्शक किंवा पर्यटन स्थळाची माहिती देणारा एकही फलक लावलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने या रस्त्याच्या कामाचे ऑडिट तसेच प्रत्यक्ष पाहणी करून रस्त्याच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे :** (१) व (२) जिल्हा नियोजन समिती, पालघर कडून पर्यटनस्थळ विकास योजना सन 2019-20 अंतर्गत झाप ते भोपतगड या 4.00 कि.मी. लांबीच्या व रु.49.96 लक्ष रकमेच्या रस्त्याच्या कामास मंजूरी देण्यात आली असून त्यापैकी 2.800 कि.मी रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे.

भोपतगड या पर्यटनस्थळाकडे जाणाऱ्या रस्त्यावर संरक्षण भिंत बांधणे हे रु.24.98 लक्ष रकमेचे काम पूर्ण झाले आहे.

जव्हार ते भोपतगड रस्त्यावर दिशादर्शक फलक लावण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.